दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
# रायगड नगरी
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
• वर्ष १६ वे • अंक ७२ • MAHMAR/2006/17212 • रायगड • शनिवार दि.५ जून २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## मुंबई महापालिकेचं ग्लोबल टेंडर रद्द, सर्व कंपन्या ठरल्या अपात्र

**दै.रायगड नगरी । मुंबई**

करोनाच्या लसीकरणासाठी मुंबई महानगरपालिकेने काढलेले ग्लोबल टेंडर अखेर रद्द करण्यात आले आहे. निविदा प्रक्रियेत भाग घेतलेल्या ९ कंपन्यांपैकी एक कंपनी पात्र ठरू शकली नसल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे. आता महापालिकेला नव्याने ग्लोबल टेंडर काढावे लागणार आहे, अशी सूत्रांची माहिती आहे. मुंबईत ज्या वेगाने लसीकरण होणे गरजेचे होते त्या वेगाने होत नसल्याचे लक्षात आल्यानंतर मुंबई महापालिकेने लशींसाठी ग्लोबल टेंडर काढण्याचा निर्णय घेतला. यानंतर मुंबईतील लसीकरणाचा वेग वाढवता येईल असा पालिकेचा प्रयत्न होता. महापालिकाने तयार केलेल्या अटी आणि शर्थी लक्षात घेता कोणतीही कंपनी पात्र ठरली नाहीत. परिणामी ग्लोबल टेंडरची प्रक्रिया रद्द झाली. मुंबई महानगरपालिकेने काढलेल्या ग्लोबल टेंडरद्वारे १ कोटी लशीचे डोस उपलब्ध करण्याचा महापालिकेचा प्रयत्न होता. विशेष म्हणजे या नविदा प्रक्रियेमध्ये कोणत्याही लस उत्पादक कंपनीने भाग घेतला नव्हता. सुरुवातीला फायझर अस्ट्रॅझेनेका या लस पुरवठादार कंपनीने यात भाग घेतला होता.

# पर्यटनातून आर्थिक विकासाला चालना द्या : ना.अजित पवार

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते श्रीवर्धन मध्ये कामांचे भूमिपूजन

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

**एक वर्षांपूर्वी आलेल्या निसर्ग चक्रीवादळात झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी ना. शरद पवार साहेब या ठिकाणी आले होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली एन.डी.आर.एफ.च्या निकषांच्या साडे तीन पट जास्त भरपाई आपण महाविकास आघाडी सरकारच्या माध्यमातून केली. कोकणच्या भूमीवर ना. शरद पवार साहेबांचे प्रेम आहे असे वक्तव्य उपमुख्यमंत्री ना. अजित पवार यांनी केले. श्रीवर्धन नगरपरिषदेच्या विविध कामांचे भूमिपूजन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आले.**



यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खासदार सुनील तटकरे तर पालकमंत्री कु.आदिती तटकरे, माजी आमदार सुरेश लाड, आमदार बाळाराम पाटील, आमदार अनिकेत तटकरे यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाला जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष सुधाकर घारे, श्रीवर्धन नगर परिषद नगराध्यक्ष फैसल मियाजान हुर्जुक, उपनगराध्यक्ष यशवंत चौलकर, मुख्याधिकारी किरण मोरे, पाणीपुरवठा जलनि:सारण व अपंग कल्याण समिती सभापती किरण केळकर, महिला व बालकल्याण समिती सभापती सौ.दिशा नागवेकर, क्रीडा व युवक कल्याण समिती सभापती सौ. रहमत आराई,स्वच्छता वैधक व सार्वजनिक आरोग्य समिती सभापती सौ.गुलाब मांडवकर, नियोजन व पर्यटन समिती सभापती वसंत यादव, नगरसेवक, नगरसेविका सर्वश्री जितेंद्र सातनाक, श्रीमती सीमा गोरनाक, श्रीमती कामिनी रघुवीर, शबिस्ता सरखोत, अनंत गुरव, प्रितम श्रीवर्धनकर, श्रीमती अंतिम पडवळ, श्रीमती प्रतिक्षा माळी, श्रीमती मीना वेश्विकर, स्वीकृत नगरसेवक अब्दुल कादिर काशीम राऊत, सुनिल पवार, गटनेता बबन चाचले, दर्शन विचारे आदि उपस्थित होते.

यावेळी बोलताना अजित पवार म्हणाले की, संकटे येतात जातात माननीय पवार साहेबांनी अनेक संकट पहिली आपण देखील पाच वर्षात चार वादळ येऊन गेलेली पाहिली. कोकणची भूमी ही ऐतिहासिक भूमी आहे. संघर्षांचा वारसा या भूमीला लाभलेला आहे. कोरोना, वादळ आदी सगळी संकटे असताना देखील विकास कामांना खिळ बसता कामा नये म्हणून सरकार झटत आहे. रस्ते, दवाखाने, आदी इतर सर्व विकासकामे सुरू आहेत. आता होत असलेले भूमिपूजन त्याच विकास प्रक्रियेचा भाग आहे अस वक्तव्य ना. पवार यांनी केले.

कोकणाला निसर्गाने भरभरून वरदान दिलेलं आहे. पर्यटन वाढीसाठी या ठिकाणी अमर्याद संधी आहेत. गतवर्षी पर्यटनासाठी आम्ही खूप मोठं बजेट केलं होतं मात्र लॉक डाउनमुळे काही करता आलं नाही. या संधीच सोन करण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे. यावेळी दोन वर्षांपूर्वी श्रीवर्धन समुद्रकिनारी प्रीवेडिंग वरून पोलीस आणि पर्यटक यांच्यात झालेल्या वादाचा मुद्दा उपस्थित केला. प्रशासनाने अल्प दरात नोंदणी करण्यासाठी त्यांना मार्गदर्शन केलं पाहिजे त्यांना इतकी चांगली वागणूक द्या की त्यांना सुरक्षित वाटले पाहिजे ते लग्नानंतर हनिमूनला देखील आपल्याकडेच आले पाहिजेत. पर्यटन व आर्थिक विकासाला चालना मिळेल याकडे लक्ष दिले पाहिजे असे मत उपमुख्यमंत्री ना. पवार यांनी व्यक्त केले.

आम्ही आता झाडाचा देखील कायदा करतोय हेरिटेज झाड कोणालाही उठसूट झाड तोडता येणार नाही स्थानिकांनी देखील आपली नैतिक जबाबदारी म्हणून वागायला शिका! वादळात एक हजार झाड पडली तर त्याच्या चारपट झाड तुम्ही लावा अशी सूचना यावेळी ना. अजित पवार यांनी जनतेला केल्या.

कामासाठी दिलेले पैसे आणि घेतलेले काम चांगले झाले पाहिजे. हा पैसा जनतेचा पैसा आहे. त्यामुळे आपण कामाचा दर्जा सांभाळला पाहिजे. ब्रिटिशांनी बांधलेलं काम अजून टिकत आणि आपलंच काम कस टिकत नाही? कॉन्ट्रॅक्टरला काम चांगलं न केल्यास ब्लॅक लिस्टला टाकायला देखील मी कमी करत नाही, अशा सूचना ठेकेदारांना दिल्या.



गेल्यावर्षी ३ जून ला निसर्गचक्रीवादळाने थैमान घातले होते त्यावेळी आजच्याच ४ तारखेला आदिती श्रीवर्धनमध्ये आली. निसर्गरम्य वसलेलं गाव उध्वस्त झालं होतं पाहून माझ्या डोळ्यातले अश्रू थांबवू शकलो नाही. त्यावेळी मी श्रीवर्धनचे गतवैभव पुर्नप्रस्थापित करू असा शब्द दिला होता. तुमच्या सहकार्याने तिप्पट मदत आपण नुकसानग्रस्त नागरिकांना दिली गेली. एक वर्षाच्या कालावधीत श्रीवर्धन पुन्हा नटलेले आहे. त्यात आणखी कशी भर पडेल याकडे आपण आमचे नेहमी लक्ष वेधलेले असते. आज कोविडचे संकट असताना विविध कामाचे भूमीपूजन झाले आहे. ती सर्व कामे वर्षभरात पूर्ण होतील. त्यावेळी आई सोमजाईच्या कृपेने कोरोनाचे संकट नसु दे आणि उदघाटन सोहळा देखील अजितदादांच्या हस्ते मोठ्या दिमाखात करू.

**खा.सुनील तटकरे**



काही वर्षांपासून वाढती लोकसंख्या व पर्यटकांची वर्दळ पाहता नवीन पाणी पुरवठा योजनेचा भूमिपूजन सोहळा आज उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या हस्ते करण्यात आले. तटकरे साहेब यांनी २०१२ साली समुद्र किनारा सुशोभीकरण केले. मात्र निसर्ग चक्रीवादळात त्याची दुरवस्था झाली. त्याची सुधारणा करण्यासाठी आठ कोटी रुपयांचा निधी आणलेला आहे. सरकारच्या माध्यमातून आपण ३० कोटी निधी उपलब्ध करून दिलात त्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त करून आज नियमांचे पालन करून कार्यक्रम छोटेखानी करण्यात आला आहे. काम पूर्ण झाल्यावर दिमाखात कार्यक्रम करू व उदघाटन देखील उपमुख्यमंत्री अजितदादा पवार साहेब यांच्या हस्तेच करू.

**ना.आदिती तटकरे, पालकमंत्री रायगड जिल्हा**

## संक्षिप्त...

### सह्याद्री अतिथीगृहातील स्लॅब कोसळला, आदित्य ठाकरे थोडक्यात बचावले



**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहातील फाऊंटनच्या वर असलेला मोठा स्लॅब कोसळल्याची घटना घडली आहे. या दुर्घटनेतून पर्यावरणमंत्री आदित्य ठाकरे थोडक्यात बचावले असल्याचे वृत्त आहे. बैठक सुरु असतानाच बाहेर स्लॅब कोसळल्याची घटना घडली. सह्याद्री अतिथीगृहातील हॉल क्रमांक ४ बाहेरील स्लॅब अचानक कोसळल्याने सह्याद्री अतिथीगृहात एकच खळबळ उडाली. ही घटना घडताच सर्वांची धावपळ झाली. या दुर्घटनेतून सर्वजण सुखरुप बाहेर पडल्याची माहिती मिळत आहे.

पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांनी आज संध्याकाळी पावणे पाच वाजता सह्याद्री अतिथीगृहात बैठक घेतली होती. दरम्यानच्या काळात बैठकीच्या खोलीबाहेर असलेले शोभेचे झुंबर त्यावरील पीओपी स्लॅबसह कोसळले. या घटनेनंतर पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे आणि उपस्थित सर्वांना सुरक्षित स्थळी नेण्यात आले. या दुर्घटनेत कोणीही जखमी झालेले नाही.

**प्राईम लोकेशनला गाळा विकणे आहे**

**पनवेल महानगरपालिका हद्दीत मिरची गल्लीत रोड टच डबल शटर (६५० बिल्टअप) एरीयाचा गाळा विक्री करणे आहे.**

**संपर्क : ९८२०३५५३४६**

## लोकनेते दि.बा.पाटील यांच्या नावासाठी मानवी साखळी आंदोलन

### आंदोलनाला कामोठे ग्रामस्थांचे लोकवर्गणीतून ३ लाख ६४ हजाराचा समर्पण निधी

**दै.रायगड नगरी । पनवेल**



नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्यात यावे, यासाठी उभारण्यात येत असलेल्या लढ्याला रायगड पासून मुंबई पर्यंत उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. शहरात, गावांमध्ये विभागनिहाय बैठका होत आहे. त्यामुळे आंदोलनांची तीव्रता या बैठकीमधून पाहायला मिळत आहे. त्यामुळे या आंदोलनाची तीव्रता अधिक असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. यावेळी लढ्यातील रक्तरंजित झेंड्याचे अनावरण करण्यात आले.

लोकनेते दि. बा. पाटील यांच्या नावासाठी १० जूनला मानवी साखळी आंदोलन होणार आहे. त्या अनुषंगाने नियोजनासंदर्भात आढावा बैठक गुरुवारी सायंकाळी पनवेल येथील आ-गरी समाज मंडळच्या सभागृहात पार पडली. या बैठकीस लोकनेते दि.बा.पाटील विमानतळ नामकरण सर्वपक्षीय कृती समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील, उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, माजी खासदार जगन्नाथ पाटील, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, जे. डी. तांडेल, कॉ. भूषण पाटील, दिपक म्हात्रे, भाजपचे युवा नेते दशरथ भगत, अँड.मदन गोवारी, गुलाब वझे, संतोष केणे, भाजपचे तालुका उपाध्यक्ष राजेंद्र पाटील, राजेश गायकर, कामगार नेते सुरेश पाटील, शेकापचे नेते मेघनाथ तांडेल, यांच्यासह रायगड, नवी मुंबई, ठाणे, कल्याण व मुंबई मधील प्रमुख कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

विमानतळाला दि. बां. चेच नाव मिळावे, अशी भावना रायगड, नवी मुंबई, ठाणे, पालघर, कल्याण, मुंबई मधील भूमिपुत्र व्यक्त करत आहे. तर विमानतळाला दिवंगत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे नाव देण्याचा घाट सरकार स्तरावर रचला जात आहे. ..../२

## चिरनेर संवेदनशील कोरोना बाधित क्षेत्रात प्रवेश बंदी

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील चिरनेर ग्रामपंचायतीचे हद्दीत कोरोनाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे या कोरोनाच्या बाधित संवेदनशील क्षेत्रात काल ४ जून ते १० जून २०२१ पर्यंत उपविभागीय अधिकारी उरण व तहसिलदार उरण यांनी हे चिरनेर गाव मायक्रो कंटेनमेंट झोन म्हणून घोषित केला आहे.

पंधरवड्यात १० हजार लोकसंख्या असलेल्या चिरनेर येथील कोरोना संसर्ग बधितांची संख्या सध्या ५४ असून, दुसऱ्या लाटेत १० रुग्णांचा जीव गमावला आहे. त्यामुळे प्रशासन खबडून जागे झाले आहे. चिरनेर ग्रामपंचायतीच्या हद्दीतील सर्वच बाजूचे प्रवेशद्वार सिल करण्यात आले असून, कोरोनाचे नियम धाब्यावर लावणाऱ्यांना चाब लावण्यासाठी दंडात्मक कारवाईसाठी गावाच्या प्रवेशद्वाराजवळ पोलिस फौजफाटाही तैनात करण्यात आला आहे.

बाहेरील व्यक्तींना प्रवेश बंदी करण्यात आल्याने कोरोनाचा प्रादुर्भाव शमविण्यासाठी येथील नागरिकांनी सहकार्य करावे असे आवाहनही उरणचे तहसिलदार भाऊसाहेब अंधारे ..../२

## कशेडी घाटातील डोंगरात खाजगी रस्त्यामुळे मोठ्या प्रमाणात भूस्खलनाची दाट शक्यता



**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वर कशेडी घाटाच्या पोलादपूरपासून प्रारंभीच चोळई गांवठाणालगत खासगी रस्त्याच्या कामामुळे मोठ्या प्रमाणात भूस्खलनाची दाट शक्यता निर्माण झाली आहे. अलिकडेच, पुर्वीच्या लेप्रसी मिशन ऑफ इंडियाच्या जमीनीवर नवीन इमारती बांधल्या जात असलेल्या चोळई गावातील भूभागासमोरील या डोंगरामध्ये प्रोकलेनने रस्त्यासाठी मोठ्या प्रमाणात उत्खनन करण्यात येत असल्यामुळे भविष्यात या नवीन इमारतींना माळीण येथील नरसंहारक भूस्खलनासारखी घटना अनुभवण्यास मिळण्याची शक्यता आहे.

पोलादपूर शहरापासून एक किमी अंतरावर कशेडी घाटाच्या रस्त्याच्या सुरूवातीलाच सडवली ग्रामपंचायत हद्दीतील एका डोंगरामध्ये अनेक वर्षांच्या माती उत्खननाने पाच वर्षांपूर्वी २ ऑगस्ट २०१६ रोजी मोठ्या प्रमाणात भूस्खलन होऊन ढाबामालक उदय चिकणे याचा ढिगाऱ्याखाली गाडला जाऊन मृत्यू झाला होता. याठिकाणापासून १०० ते ३०० मीटर अंतरावर वळणावरील चोळई गावठाणालगत एका लालमातीच्या डोंगरावर दोन दिवसांपासून एका प्रोकलेनने खासगी रस्त्यासाठी उत्खननाचे काम सुरू असून याठिकाणी मोठ्या आकाराचे दगड मोठ्या संख्येने मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गालगत येऊन थांबले आहेत. या दगडांना फोडून डबर करण्याचे कामही याच ठिकाणी सुरू झालेले पाहण्यास मिळत आहे. या खासगी रस्त्याच्या कामापासून साधारणत: अर्धा किमी अंतरावर एका डोंगरावर दोन वर्षांपूर्वी ब्लास्टींग करून डोंगर फोडण्यात आल्याने येथील जमिन व डोंगराला हादरे बसून माती सैल झाली आहे. यामुळे महामार्गावर दरडी ..../२

## प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांच्या रिक्त जागा भरण्याची मागणी

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यात एका प्राथमिक आरोग्य केंद्राच्या अनुषंगाने आठ उपकेंद्रे आहेत. त्या आणखी जसखार आणि वशेणी अशा दोन उपकेंद्रांना मंजुरी देण्यात आली आहे.मात्र तालुक्यात एकमेव असणाऱ्या कोप्रोली प्राथमिक आरोग्य केंद्रात मनुष्यबळाचा तुटवडा अगोदर भासत आहे.आरोग्य केंद्रात असणाऱ्या अल्प कर्मचाऱ्यांवर रुग्णसेवेचा मोठा ताण पडत आहे.त्यामुळे आरोग्य केंद्रात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णाना उपचार घेण्यास अधिक विलंब होत आहे.पर्यायाने वेळेवर उपचार मिळत नसल्याने गरीब गरजूंना खाजगी रुग्णालयाचा रस्ता धरावा लागत आहे.

उरण तालुक्यातील कोप्रोली येथे रायगड जिल्हा परिषदेच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या दोन लाख लोक संख्येसाठी तालुक्यातील एकमेव प्राथमिक आरोग्य केंद्र आहे.त्यावर आधारित आठ उपकेंद्र आहेत. आणि नव्याने मंजुर झालेले वशेणी ,आणि जसखार अशी उपकेंद्रे आहेत.ग्रामीण भागातील गरीब, गरजू रुग्णांना वेळेत व माफक दरात उपचार मिळावे यासाठी चालविल्या जाणाऱ्या या आरोग्य केंद्राला आणि उपकेंद्रांना सध्या अनेक बाबींनी ग्रासले आहे. या आरोग्य केंद्रासाठी भव्य इमारत उभी आहे. मात्र या भव्य रुग्णालयात सध्या दोन आरोग्य अधिकारी व तीन-चार परिचरिका ,आरोग्य सेवकांच्या मनुष्य बळावर कारभार सुरू आहे. शिपाई ,सिक्युरिटी गार्डची ही कमतरता आहे. या रुग्णालयात ग्रामीण भागातील रुग्ण ताप, मलेरिया, रक्तदाब, श्वसनाचे विविध आजार, सर्प तसेच स्वानं दंश, व अन्य उपचारासाठी मोठ्या प्रमाणात येतात मात्र साध्या साध्या उपचारासाठी रुग्णांना तास-दीड तास ताटकळत बसावे लागत आहे. त्यामुळे रुग्णांना नाहक त्रास सहन करावा लागतो.रुग्णालयात कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना अनेक प्रसंगांना तोंड देत रुग्णसेवा करावी लागत आहे.गावो गावी जाऊन लसीकरण, रुग्णाची माहिती घेणे अशी इतर कामे ही करावी लागत आहेत.

त्यातच उपचार करण्यासाठी लागणाऱ्या साहित्याची कमी असल्याने जुन्या साहित्याच्या आधारे उपचार करण्याची वेळ या कर्मचाऱ्यांवर आली आहे.रायगड जिल्हा परिषदेकडे या आरोग्य केंद्रासाठी कर्मचारी नेमण्यासाठी वेळोवेळी मागणी करूनही त्याकडे सातत्याने दुर्लक्ष करणयात येत आहे. त्यातच आरोग्य अधिकारी व कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी निवास व्यवस्था नसल्याने रात्री अपरात्री एखाद्या रुग्णांला येथे उपचार मिळत नसल्याने जनतेची मोठी गैरसोय होत आहे.या उरण तालुक्याला आरोग्य उप केंत्राच्या मंजुरी बरोबर एकमेव असणाऱ्या तालुका आरोग्य केंद्रात मंजूर असणाऱ्या मनुष्य बळाची कमतरता ही भरून काढावी अशी मागणी होत आहे.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

ग्रामपंचायत पालीदेवद

श्रीमती.योगिता राजेश पाटील — सरपंच
श्री.अशोक गुणाजी पाटील — उपसरपंच

गर्दी टाळा — कोरोना विषाणूला थांबवा

सदस्य
श्री.चेतन पांडुरंग केणी, श्रीमती.श्रद्धा राजेश केणी, श्री.दिवेश दत्तात्रेय भगत, श्रीमती.पुनम प्रमोद भगत, श्रीमती.कृतज्ञा अजिंक्य भगत, श्री.संदीप भगवान म्हसकर, श्रीमती.प्राची अमित जाधव, श्री.किसन महादेव भुजंग, श्रीमती.आशा अनिल उलवेकर, श्रीमती.पुष्पा पांडुरंग म्हसकर, श्रीमती.ज्योती रवींद्र केणी, श्रीमती.अनिता आत्माराम पाटील, श्रीमती.कविता प्रकाश पोपेटा, श्री.चंद्रकांत चाहू पोपेटा, श्री.महेश जनार्दन पाटील

ग्रामविकास अधिकारी : श्री.नंदकिशोर कृष्णा भगत

झाडे लावा, पर्यावरण वाचवा !



जागतिक पर्यावरण दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

सामाजिक अंतर राखा... कोरोनापासून दूर रहा...

SOCIAL DISTANCING

ग्रामपंचायत गिरवले

सौ.अनिता अशोक गायकर — सरपंच
श्री.प्रताप चंद्रकांत हातमोडे — उपसरपंच

सदस्य
श्री.उदय अंबाजी हातमोडे, सौ.शैला विलास राजगुडे, सौ.समिता पांडुरंग हातमोडे, श्री.दिपक कृष्णा वाघमारे, सौ.निर्मला जनार्दन हातमोडे, सौ.अविता पद्माकर भोमकर

ग्रामसेवक : श्री.सुरेश बाळु मोहिते

कापडी पिशवी घरोघरी पर्यावरणाचे रक्षण करी



जागतिक पर्यावरण दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

मास्क वापरा, कोरोनाला हरवा

ग्रामपंचायत वलप

सौ.जयमाला भोलेनाथ पाटील — सरपंच
श्री.मनोज कृष्णा पाटील — उपसरपंच

सदस्य
श्री.भोलेनाथ राजाराम पाटील, सौ.प्रियांका राजेश पाटील, सौ.निलम संदीप जोशी, श्री.रोहित रमेश वाघे, श्री.नवनाथ महादू खुटारकर, सौ.ज्योत्स्ना राजेश पाटील, सौ.कविता प्रमोद पाटील

ग्रामसेवक : श्री.सतीश देवकते

काम करा लाख मोलाचे निसर्ग संवर्धनाचे



जागतिक पर्यावरण दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

ग्रामपंचायत पारगाव

सरपंच, उपसरपंच, सर्व सदस्य

साबणाने हात धुवा, जीवनातून रोग मिटवा.

ग्रामविकास अधिकारी :

पर्यावरणाची करा रक्षा पृथ्वीची होईल सुरक्षा



जागतिक पर्यावरण दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

ग्रामपंचायत नेरे

सरपंच, उपसरपंच, सर्व सदस्य

घाबरु नका... पण जागरुक रहा... कोरोना विषाणूपासून आपला बचाव करा...!

ग्रामसेवक :

काम करा लाख मोलाचे निसर्ग संवर्धनाचे



जागतिक पर्यावरण दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

मास्क वापरा, कोरोनाला हरवा

ग्रुप ग्रामपंचायत चिपळे

सौ.सविता राजू हिंदोळा — सरपंच
श्री.मंगेश पंढरीनाथ फडके — उपसरपंच

सदस्य
सौ.कांता विलास फडके, सौ.निकिता अनिल फडके, सौ.मिनाक्षी राजेंद्र फडके, सौ.रंजना रमेश पाटील, सौ.जयश्री गणेश म्हस्कर, श्री.धनंजय लक्ष्मण पाटील, सौ.नर्मदा दिलीप फुलोरे, कु.मुकेश कान्हा फडके, कु.सुनील धाऊ ठाकूर, कु.ज्ञानेश्वर सदाशिव फडके

ग्रामविकास अधिकारी : श्री.बबन राठोड

हवी असेल शुद्ध हवा, तर झाडे लावा, झाडे जगवा

झाडे लावा, पर्यावरण वाचवा !


## अपघातात २ जण जखमी

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

मुंबई –गोवा महामार्गावर ऐ–नघर ग्रामपंचायतीच्या हद्दीतील हॉटेल श्री समर्थ कृपाच्या समोरच असलेल्या दुभाजकाला एका दुचाकीस्वाराची जोरदार धडक बसली. त्यामुळे झालेल्या अपघातात दुचाकीस्वार चालक गंभीररित्या जखमी झाला असुन पाठीमागे बसलेला एक जण हा किरकोळ जखमी झाला आहे. मुंबई – गोवा महामार्गावरुन आपल्या दुचाकीवरुन दारुच्या नशेत प्रवास करणारा दुचाकीस्वार चालक रवि जाधव हा मोटर सायकल वरुन वाकण बाजुकडुन खांबकडे जात होता. तो ऐनघर ग्रामपंचायतीच्या हद्दीतील हॉटेल श्री समर्थ कृपाच्या समोर आला असता चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने तेथील दुभाजकाला दुचाकीची जोरदार धडक होऊन हा अपघात झाला. रवि जाधव (वय–२९) रा. तळई, खांब आदिवासीवाडी याच्या डोक्याला गंभीर मार लागला. साधुराम जाधव (वय–४० हा किरकोळ जखमी झाला आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## मानवी साखळी आंदोलन

मात्र दि. बा. पाटील यांचे नाव देण्यासाठी रायगड पासून मुंबईपर्यंत ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत. त्यांच्या नावाला समर्थन देण्यासाठी चळवळ उभारली जात आहे. त्यासाठी आता विविध राजकीय पक्षांचे नेते, सामाजिक कार्यकर्ते, प्रकल्पग्रस्त आणि शेतकऱ्यांच्या संघटना एकत्र आल्याने हा लढा आता व्यापक रूप धारण करत आहे. येत्या १० जूनला रायगड, ठाणे, नवी मुंबई, कल्याण, पालघर, अंबरनाथ, डोंबिवली, भिवंडी, बदलापूर, मुंबई या ठिकाणी मानवी साखळी तयार करून सरकारचे लक्ष वेधण्यात येणार आहे. हे आंदोलन झाल्यानंतर २४ जूनला लोकनेते दि. बा. पाटील यांच्या स्मृतिदिनी हा लढा अधिक व्यापक करून सिडको भवनाला घेराव घालण्यात येणार आहे. त्याचीही तयारी या बैठकीतून पहायला मिळाली.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला नाव देण्यासाठी उभारण्यात आलेल्या आंदोलनाला कामोठे ग्रामस्थांच्या ३६४ कुटुंबांनी प्रत्येकी १ हजार रूपये जमा करून ०३ लाख ६४ हजार रुपये समर्पण निधी दिला आहे.कामोठे ग्रामस्थांनी केंद्रीय कृती समितीस हा धनादेश सुपूर्द केला

यामागील उद्दिष्ट सांगताना कामोठे ग्रामस्थ पंच कमिटीने यावेळी सांगितले कि, गावातील ज्या ३६४ कुटूंबानी ७० च्या दशकात लोकवर्गणी जमा करून व स्वतः श्रमदान करून आपल्या लाडक्या लोकनेत्यास अर्थात दिबांना त्यांचे घर बांधून दिले होते.त्याच ३६४ कुटूंबांनी आजही दिंबावरील प्रेम व्यक्त करताना घरटी ०१ हजार समर्पण निधी या आंदोलनास दिला आहे, असे नमूद केले. या बैठकीत भारत मुक्ती मोर्चा व त्यांच्या संलग्न ६८ संघटनांनी या आंदोलनास जाहीर पाठिंबा दिला.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दिवंगत दि. बा. पाटील यांचे नाव देण्यात यावे, या मागणीसाठी १० जूनला ठाणे व रायगड जिल्ह्यात मानवी साखळी तयार करून अनोख्या पद्धतीने आंदोलन करणार आहे. हे आंदोलन यशस्वी करण्यासाठी जनजागृतीला मोठ्या प्रमाणात सुरुवात झाली आहे, त्याला ग्रामस्थांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

## कोरोना बाधित क्षेत्रात प्रवेश बंदी

यांनी केले आहे. तर मागील ५ दिवसापूर्वी चिरनेर येथील उपअ–ारोग्य केंद्राच्या वतीने घेण्यात आलेल्या कोरोना तपासणीला येथील १० हजार लोकसंख्या असलेल्या नागरिकांनी प्रतिसाद न देता दिवसभरात फक्त ७ नागरिकांनी तपासणी केली.

त्यामुळे कोरोनाच्या रुग्ण संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होऊन कोरोना बाधित रुग्णांच्या मृत्यूचे प्रमाण वाढू लागल्याने खबडून जागे झालेल्या प्रशासनाने सर्वच बाजूने गावचे मार्ग रोखले असून,संबंधित ठिकाणी कोरोना बाधित क्षेत्र प्रवेश बंदीचे बॅनर्स लावण्यात आले आहेत.

## भूस्खलनाची दाट शक्यता

कोसळण्याप्रमाणेच लालमातीच्या ढिगाऱ्याखाली नवीन इमारती जाण्याचा धोकाही वाढला आहे.

पोलादपूर येथील महसूल विभागाने या खासगी रस्त्याच्या कामात माती उत्खननानंतर वाहतूक होत नसल्याची खात्री केली आहे अथवा दंडात्मक आकारणी केली आहे का, याबाबत कोणतीही माहिती प्राप्त झाली नसून नजिकच्या पावसाळ्यात या डोंगरातून मोठ्या प्रमाणात लालमातीचे ढिगारे मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावर येऊन वाहतूक ठप्प होण्यासह लोकवस्तीसही धोका निर्माण झाल्याकडे प्रशासनाचे अक्षम्य दूर्लक्ष होत आहे.

## राजकीय क्षेत्रात मोठ्या पदावर राहून सुद्धा माणूसकी व दानशूरपणा जपणारा सहृदय लोकनेता रामशेठ ठाकूर : बी.जी.पाटील

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राजकारणात पद व संपत्ती वाढली की माणूसकी व दानशूरपणा विसरणारे बरेच आहेत. परंतू माणुसकी ज्यांच्या रक्तातच आहे. असे भारतिय जनता पक्षाचे जेष्ठ नेते माजी खासदार व गोरगरीब, दिव्यांग, सर्वसामान्यांचे लोकनेते रामशेठ ठाकूर हे खरोखरच दिव्यांग तसेच वंचित वर्गाविषयी सहानुभुती व आपलेपणा असणारे मानवतावादी राजकारणी व उद्योगपती आहेत.



कोरोना लॉकडाऊनच्या कठीण काळात सन २०२० व २१ मध्ये दोन्ही वर्षी उपासमारीच्या संकटात सापडलेल्या दिव्यांग कुटुंबांना आर्थिक निधी, धान्य व जीवनावश्यक वस्तूंचे वाटप व अन्न दान मा.रामशेठ ठाकूर साहेब यांनी सढळ हातांने केले व आज सुध्दा करीत आहेत. पैसा अथवा संपत्ती सगळेच कमवितात परंतू गरीब,गरजू व दिव्यांग यांच्या करिता नियमितपणे मदत करणारे मा.रामशेठजी ठाकूर यांच्या सारखी माणसें फारच दुर्मिळ. आम्ही अनेक वेळा दिव्यांगांच्या विविध समस्या उदा.दिव्यांग निधी, दिव्यांगांना व्यवसायासाठी जागा या बाबत मा.आमदार प्रशांतजी ठाकूर,रामशेठजी ठाकूर यानां भेटायला गेलो तेव्हा प्रत्येक वेळी त्यांनी आमचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले. अत्यंत साकारात्मक प्रतीसाद देऊन समस्या ही सोडविण्याचा प्रयत्न केला.

त्यांच्या ७० व्या वाढदिवसाचे औचित्य साधून त्यांना चांगले आरोग्य व दिर्घायुष्य मिळावे अशा शुभेच्छा देत आहोत तसेच त्यांच्या या मानवतावादी कार्याचे अभिनंदन करीत आहोत. असे अपंग क्रांती संघटना व अपंग उत्कर्ष सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष बी.जी.पाटील यांनी सांगितले. संघटनेचे जिल्हाध्यक्ष विलास फडके यांनी ही शुभेच्छा दिल्या. संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष बाळाराम रोडपालकर यांनी काव्यमय शुभेच्छा फारच बोलक्या आहेत. दिव्यांगांच्या दिवसाची सुरुवात आहात तुम्ही, दिव्यांगांच्या सुखाचे सागर आहात तुम्ही !दिव्यांगांच्या मदतिचे आधारस्तंभ तुम्ही...!आणि म्हणूनच वाटते– –आरोग्य संपन्न जीवन जगावे तुम्ही, शतायुषी आयुष्य जगावे तुम्ही! संघटनेचे विभाग प्रमुख– विनोद देवकर– कळंबोली,दत्तात्रेय पाटील– तळोजा,विकास ठाकूर– नावडे रोडपाली,अतूल रायबोले–खांदा कॉलनी,उज्वला नलावडे– नवीन पनवेल, रोशन एंजल–कामोठे, प्रकाश देसाई–खारघर,कुलदीप तांबे–पनवेल या सर्वांनी सुध्दा शुभेच्छा दिल्या.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## बंद फ्लॅटमधील रोख रक्कम केली लंपास

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका बंद फ्लॅटमधील ठेवलेली रोख रक्कम अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची घटना करंजाडे वसाहतीत घडली आहे.

शमशुद्दिन अजमुद्दिन शेख यांचा करंजाडे से.-५ येथे एक फ्लॅट असून सदर फ्लॅटचे काम बाकी असल्याने गेल्या काही महिन्यांपासून तो बंद होता. त्या बंद फ्लॅटमध्ये एका विटकरी रंगाच्या बॅगेत त्यांनी १ लाख ३८ हजार ठेवले होते. परंतु कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांच्या संमत्तीशिवाय लबाडीच्या इराद्याने सदर रोख रक्कम चोरून नेल्याची तक्रार त्यांनी पनवेल शहर पोलिस ठाण्यात दाखल केली आहे.

## फ्रंटलाइन वर्कर यांना कोविड प्रतिबंधक लसीकरण; २३६ लाभर्थांना देण्यात आली

**दै.रायगड नगरी । उरण**

ओम गगनगिरी हॉस्पिटल नवी मुंबई व रायगड जिल्हाधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने, जिल्हा पुरवठा अधिकारी रायगड अलिबाग व तहसीलदार उरण यांच्या मार्गदर्शनाखाली उरण तालुकयातील वीर वाजेकर कॉलेज फुंडे येथे नुकतेच सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधील फ्रंट लाइन वर्कर यांना कोविड प्रतिबंधक लस २३६ लाभर्थांना देण्यात आली. उरण तहसीलदार भाऊसाहेब अंधारे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.



त्यामध्ये ६८ रास्त भाव दुकानदार, किरकोळ केरोसीन विक्रेते ९८, तालुक्यातील पेट्रोल पंप कर्मचारी व गॅस वितरक कर्मचारी यांना लस देण्यात आली.

यावेळी उरणचे तहसीलदार भाऊसाहेब अंधारे, निवासी नायब तहसिलदार संदिप खोमणे, डॉक्टर वसंत राऊत, डॉक्टर नेहा राऊत, निता कोरेगावकर, सोमालींगा बिरासदार, सी.आर.पाटील, वैशाली पाटील, विलास पाटील, ललिता घरत, नितीन घरत, रास्त भाव दुकानदार अध्यक्ष महेंद्र पाटील व उपाध्यक्ष सौ. रेश्मा कडू व तहसील कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी तसेच, वीर वाजेकर कॉलेज फुंडे चे प्राचार्य डॉ.एस.बी.ओहोळ, उपप्राचार्य डॉ. विलास महाले, प्रा.दिलीप केंगार, डॉ. आबासाहेब सरवदे आदी उपस्थित होते.

# अखेर एक्सप्रेस फीडरचा मार्ग मोकळा ; नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांचा पाठपुरावा

**दै.रायगड नगरी । माथेरान**

सातत्याने कमी दाबाने पाणी पुरवठा होत असल्याने नागरिकांना पर्यटन हंगामात अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते. याचा इथल्या पर्यटनावर विपरीत परिणाम झाला होता. वारंवार वीज पुरवठा खंडित होत असल्याने यामुळे नेरळ उल्हास नदीतून उपसा केलेले पाणी पुन्हा माघारी जात होते याकारणास्तव यावर उपाय म्हणून नेरळच्या एमएसईबी सब स्टेशन मधून एक्सप्रेस फिडर घेण्याचे प्रस्तावित होते. जेणेकरून जुम्मा पट्टी व वॉटर पाईप येथील पंपगृहास २४ तास इलेक्ट्रिक सप्लाय मिळेल व माथेरानला पाणी पुरवठा जास्त प्रमाणात होण्यासाठी एक्सप्रेस फिडर महत्वाची होती.

माथेरानला पाणी पुरवठा करणेसाठी उल्हास नदीकाठी कुंभे येथे व जुम्मा पट्टी तसेच वॉटर पाईप येथे पंपिंग स्टेशन आहेत. यापैकी कुठल्याही ठिकाणी पाच मिनिटे जरी वीज पुरवठा खंडित झाला तरी त्याचा परिणाम पाणी पुरवठ्यावर होऊन माथेरानला दीड ते दोन तास कमी दाबाने पाणी येते. दिवसातून तीन ते चार वेळा लाईट गेली की संपूर्ण माथेरानचा





पाणी पुरवठा विस्कळीत होत होता.

या कामांतर्गत नेरळ माथेरान घाटातील नेरळ ते जुम्मा पट्टी इलेक्ट्रिक ओव्हरहेड लाईन नुकताच टाकून झाली आहे. तथापि घाटातील काही किरकोळ कामे करावी लागणार आहेत.

नेरळ एमएसईबी सब स्टेशन ते नेरळ पोलीस स्टेशन या महत्वाचे टप्प्यातील रोड क्रॉसिंगचा महत्वाचा टप्पा आज दि.४ रोजी पूर्ण झाला. उर्वरित कामे तातडीने पूर्ण करण्यात येणार असल्याचे संबधीत अधिकारी वर्गाने स्पष्ट केले आहे. या टप्प्याचे काम पूर्ण होण्यासाठी माथेरानच्या विद्यमान नगराध्यक्षा प्रेरणा सावंत, नगरपरिषद सभागृह गटनेते प्रसाद सावंत तसेच नगरपरिषद लिपिक रत्नदीप प्रधान यांचे कडून विशेष मदत झाली आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग पनवेल येथील कार्यकारी अभियंता बामणे तसेच उपविभाग कर्जत येथील उप अभियंता अजयकुमार सर्वगड व शाखा अभियंता कुणाल गोसावी यांनी महत्वाची भूमिका बजावली आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अधीक्षक अभियंता गजभिये साहेब, अधीक्षक अभियंता (यांत्रिकी) पांडे , कार्यकारी अभियंता सूर्यवंशी , उप अभियंता देशमुख , भोसले यांचे विशेष सहकार्य मिळाले. माथेरान पाणी पुरवठा योजनेचे अनुभवी अभियंते किशोर देशमुख व जगन्नाथ दाभणे यांनी कार्यक्षेत्रावर स्वतः जातीने उपस्थित राहून व कमीत कमी वेळात काम पूर्ण करून घेतले. त्यामुळे यापुढे माथेरान करांना चांगल्या प्रकारे वेळेवर पाणी पुरवठा करण्यात येणार असून कुणालाही पाणी टंचाईला सामोरे जावे लागणार नाही.सदर कामांमुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

माथेरान येथे अनेक वर्षे या विभागात उत्तम प्रकारे सेवा दिल्यानंतर सेवानिवृत्त होऊन देखील आपल्या कामावरील उत्तम पकड आणि कामगारांना सोबत घेऊन अत्यंत सचोटीने कामे करण्याची क्षमता असलेले एक अनुभवी अभियंते किशोर देशमुख यांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाने माथेरान मध्ये काम करण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे त्यामुळे या गावातील इत्यंभूत माहिती असल्यामुळे किशोर देशमुख हे नक्कीच सर्वतोपरी सहकार्य करून पाण्याबाबतीत उद्भवणाऱ्यासमस्या मार्गी लागतील अशी नागरिकांना आशा आहे.

## रंगभूमीवरील कालाकारांच्या प्रश्नांभसंदर्भात 'संवाद माले'चे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भारतीय जनता पार्टी, उत्तर रायगड च्या वतीने कोरोना वैश्वि क महामारीच्या काळात समाजातील विविध घटकांसाठी अनेक उपक्रम राबवले जात आहेत. त्याअंतर्गत भाजपा सांस्कृतिक सेलच्या वतीने प्रायोगिक रंगभूमीवरील कालाकारांच्या प्रश्नां संदर्भात 'संवाद माले' चे आयोजन केले आहे.

या उपक्रमामध्ये लातूर महापालिकेचे सभागृहनेते तथा भाजपा सांस्कृतिक सेलचे प्रदेश अध्यक्ष ऍड शैलेश गोजमगुंडे हे रविवारी ६ जून सायंकाळी ५ वाजता सीसको वेबेक्स च्या माध्यामातून ऑनलाईन संवाद साधणार आहे. या उपक्रमाचे आयोजन भाजपा उत्तर रायगडचे जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर व पनवेल महानगरपालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले आहे.

कोरोना महामारीमुळे अनेक व्यवसाय ठप्प झाले आहेत. ज्यामध्ये नाट्य, कलाक्षेत्रही संपूर्णपणे बंद आहे. गेले अनेक महिने नाट्य क्षेत्र संपुर्णपणे बंद असल्यामुळे कलाकार तसेच बॅकस्टेज वर काम करण्याऱ्या लोकांवर उपासमारीची वेळ आली आहे. त्यामध्येच सिरीयल व चित्रपटाच्या शुटींग वर सुद्धा महाराष्ट्रामध्ये बंदी असल्यामुळे छोटे मोठे काम मिळणे ही ह्या कलाकारांना अवघड झाले आहे.

त्यामुळे त्यांच्या प्रश्नांसंदर्भात संवाद साधण्यासाठी या ऑनलाईन संवादमालेचे आयोजन करण्यात आले आहे. ऑनलाईन संवाद माला ह्या उपक्रमामध्ये प्रयोगिक रंगभूमीवरील कलाकार, बॅकस्टेज आर्टीस्ट, लेखक, निर्माते, दिग्दर्शक तसेच ह्या क्षेत्राशी जोडलेल्या प्रत्येकाने ह्या ऑनलाईन सत्रात सामील व्हावे, असे आ-वाहन भाजपा सांस्कृतिक सेल,उतर रायगड चे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन ह्यांनी केले.

या संदर्भातील अधिक माहितीसाठी ९०२९५८०३४३ ,९८७०११६९६४ या क्रमांकावर संपर्क साधावा, असेही त्यांनी कळविले आहे.

ऑनलाईन कार्यक्रमाची लिंक :

cisco webex app online

https://thakurinfraprojects.webex.com/thakurinfraprojects/j.php?MTID=mba428c896e433f907b2f48ea533fb77d

Sunday, Jun 6, 2021 5:00 pm

Meeting number: 184 063 2924

Password: tzXTg5u8Np3

## सुधागड तालुक्यात ५ कोरोना बाधित रुग्णांची नोंद

**दै.रायगड नगरी । पाली**

सुधागड तालुक्यात गुरुवारी (ता.३) ५ कोरोना बाधित रुग्णांची नोंद झाली आहे. तर ११ जणांनी कोरोनावर मात केली आहे. सध्या तालुक्यात कोरोनाचे ६० सक्रिय रुग्ण आहेत अशी माहिती तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. शशिकांत मढवी यांनी दिली. तालुक्यात आत्तापर्यंत कोरोनाचे ११५० रुग्ण झाले असून १०३६रुग्ण बरे झाले आहेत. आणि तब्बल ५४ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. अशी माहिती देखील तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. शशिकांत मढवी दिली आहे. नागरिकांनी शासन नियमांचे पालन करून योग्य खबरदारी व काळजी घ्यावी आणि घाबरून जाऊ नये असे आवाहन डॉ. शशिकांत मढवी यांनी केले आहे.

## कुंभारवाडा येथे गरजूंना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप



**दै.रायगड नगरी । पनवेल**

मा.खा.लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त प्रभाग क्रमांक १४ मधील कुंभारवाडा येथे गरजूंना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप झाले. यावेळी नगरसेवक मनोहर म्हात्रे व मुकीद काझी, पनवेल शहर व्यापार आघाडी संयोजक परमेश्वर गिरे,राजेंद्र परदेशी, रितेश पवार, अनिल चव्हाण, पोपट गिरे, संदीप पनवेलकर आणि कार्यकर्ते उपस्थित होते.


### सावधान नोटीस

तमाम जनतेस या सावधान नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.शांताराम चंदूलाल घरत व इतर रा.चिर्ले, पो.जासई, ता.उरण, जि.रायगड येथील खालील नमूद केलेल्या शेतजमिनीच्या मिळकतीमध्ये वारसदार आहेत.

**शेतमिळकतीचे वर्णन**

| स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ४४ | ४ अ | ०-३५-९<br>पो.ख. ०-१६-३<br>एकूण ०-५२-२ | ७.७९ |

वरील मिळकती संदर्भात आमचे अशिलांनी दि.०७/०३/२००७ रोजीचे कुलमुखत्यारपत्र श्री.विलास जनार्दन खैरे, रा.उरण, कोटनाका, ता.उरण, जि.रायगड यांचे लाभांत दिले होते. परंतु आमचे अशिलांनी दिलेल्या कुलमुखत्यारपत्राचा बेकायदेशीरपणे उपयोग करून श्री.विलास जनार्दन खैरे यांनी खुप मोठी फसवणूक केली आहे. तसेच वेगवेगळ्या त्रयस्थ लोकांबरोबर सदर मिळकती संदर्भात खोटे व्यवहार केलेले आहे. तरी या नोटीशीच्या आधारे आम्ही हे कुलमुखत्यारपत्र रद्द करीत आहोत.

तरी वरील जमिनीसंदर्भात कोणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार श्री.विलास जनार्दन खैरे यांचे बरोबर करू नये, अगर केल्यास तो बेकायदेशीर होईल व आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही व रद्दबातल होणेस पात्र राहील, असे घडल्यास आमचे अशिलांना संबंधित व्यक्तीविरुद्ध कायदेशीर कारवाई करावी लागेल, हे कळावे.

दि.०४/०६/२०२१

**सही/-**
**ॲड.प्रगती ज.माळी-घरत**
**यशोकिरण को.ऑप.हौ.सो.**
**ऑफिस नं.९, पहिला मजला, सावरकर चौक, लोखंडीपाडा, पनवेल-४१०२०६**
**मो.नं.८६५२३६५२५२**


# पोलादपूर तालुक्यात पावसाची एकदिवसा आड हजेरी ; वातावरणामध्ये दररोज बदल

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यात तौक्ते वादळानंतर वातावरणातील बदल प्रकर्षाने जाणवू लागला असून गेल्या आठ दिवसांमध्ये एकदिवसाआड पावसाने हजेरी लावली आहे. परिणामी, साथीचे आजार तसेच मच्छरांसह किटकांचा प्रार्दूभाव वाढण्याची शक्यता वाढीस लागली आहे.

पोलादपूर तालुक्यात मे महिन्याच्या प्रारंभापासून वातावरणातील उष्णता ४३-४५ अंश सेल्सियस पर्यंत नोंदली जात असून तौक्ते वादळानंतर वातावरणात बदल झाला आहे. वादळापूर्वीपासून पोलादपूर तालुक्यातील ग्रामीण भागात वीजांचा कडकडाट तसेच वादळीवाऱ्यासह पाऊस सुरू झाला होता. मात्र, तौक्ते वादळानंतर चार दिवस हवेतील उष्णता वाढली आणि त्यानंतर पावसाने एकदिवसाआड हजेरी लावण्यास सुरूवात केली आहे.

यामुळे एक दिवस उष्मा अनुभवणाऱ्या पोलादपूरकरांना दुसऱ्या दिवशी हवेतील गारवा दिलासादायक ठरत असताना सतत बदलत्या तापमानासह वातावरणातील बदल अनेकांना डोकेदुखी, डोळे जड होणे, सर्दी खोकला असे साथीचे आजार होऊ लागले आहेत.

गेल्या काही दिवसांपासून सायंकाळी मच्छरांचा प्रार्दूभाव आणि दिव्यावरच्या किड्यांसह पाखरांचा त्रास वाढला आहे. मात्र, कोरोना संसर्ग पार्श्वभूमीवर खासगी दवाखान्यामध्ये साथीच्या आजारांवरील उपचार करण्यास जाण्यास नागरिकांमध्ये अनुत्सुकता दिसून येत असून मेडीकल स्टोअरमधून औषधे व गोळ्या घेऊन स्वत:वरच उपचार करण्याची मानसिकता वाढीस लागली आहे.







# संक्षिप्त...

## पनवेल महापालिका आणि बिसलेरी यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरण विषयक वेबिनारचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आंतरराष्ट्रीय पर्यावरण दिनाचे औचित्य साधून पनवेल महापालिका आणि बिसलेरी कंपनीने 'युझ्ड प्लास्टिक मॅनेजमेंट अ‍ॅण्ड रिसायकलिंग ' या विषयावरती आज गुगल मीटच्या माध्यमातून वेबिनारचे आयोजन केले होते.

सध्या महापालिका क्षेत्रात बिसलेरीच्या सहयोगातून 'बॉटल्स फॉर चेंज'हा उपक्रम राबविण्यात येत आहे.सर्व प्रकारच्या प्लॅस्टिकमुळे मोठ्या प्रमाणावर प्रदुषण होत असून हे टाळण्यासाठी प्लॅस्टिकचे पुर्नचक्रीकरण करणे महत्वाचे आहे. याच उद्देशाने महापालिकेने सर्व प्रकारचे स्वच्छ प्लॅस्टिक संग्रहित करण्याची जागरूकता मोहिम सुरू केली आहे. या पार्श्वभूमीवर पालिका क्षेत्रातील गृहनिर्माण संस्थामध्ये प्लॅस्टिक संग्रहीत करण्या विषयी मोहिम सुरू करण्यात आली आहे. या प्रकल्पासाठी बिसलेरी कंपनी महापालिकेला सहाय्य करणार आहे.

तसेच याविषयावरती दिनांक ८,१०,१५ जून ला चार वाजता गुगल मीटच्या माध्यमातून वेबिनारचे आयोजन करण्यात येणार आहे. या ऑनलाईन वेबिनारची गुगल लिंक पनवेल महानगरपालिकेच्या फेसबुक खात्यावरून प्रसारित करण्यात येणार आहे. बिसलेरीच्या श्रेया सुधीर या वेबिनारच्या माध्यमातून मार्गदर्शन करणार आहेत.

## टेबल टेनिस पटू स्वस्तिका घोषचे अभिनंदन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलची विद्यार्थिनी व रायगड जिल्हा टेबल टेनिस असोसिएशनची खेळाडू स्वस्तिका घोषने जागतिक टेबल टेनिस खेळाच्या १९ वर्षीय मुलींच्या गटात रँकिंगमध्ये चौथ्या स्थानी झेप घेतली आहे. अशी कामगिरी करणारी स्वस्तिका ही भारतातील पहिली टेबल टेनिस खेळाडू आहे. त्याबद्दल तिचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी अभिनंदन केले. यावेळी स्वस्तिकाचे पालक व प्रशिक्षक संदीप घोष उपस्थित होते.

# चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर कायमस्वरूपी उपाययोजना करणार : उपमुख्यमंत्री



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

कोकण किनारपट्टीवर आतापर्यंत चार वादळं येवून गेली. चक्रीवादळाच्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर कोकणसाठी कायमस्वरूपी संरक्षण उपाययोजना करण्याचा प्रयत्न राज्य सरकार कडून केला जात आहे. यासाठी कुठेही निधी कमी पडता कामा नये, याची दक्षता देखील घेतली जात असल्याचे प्रतिपादन आज (दि.४ जून) रोजी उपमुख्यमंत्री ना.अजित दादा पवार यांनी श्रीवर्धन येथे केले. श्रीवर्धन येथील कोविड-१९ बाबतच्या उपाययोजना व ताऊक्ते चक्रीवादळ नुकसान आढावा बैठकीत ते बोलत होते.

श्रीवर्धन नगरपरिषदेच्या पाणी पुरवठा प्रकल्प व बीच सुशोभिकरण करणे या कामांचे भूमीपूजन त्यांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर त्यांनी श्रीवर्धन उपविभागीय अधिकारी कार्यालय येथे जिल्ह्यातील प्रमुख अधिकाऱ्यांसमवेत आढावा बैठक घेतली. यावेळी आरोग्यमंत्री राजेश टोपे, पालकमंत्री कु.आदिती तटकरे, खासदार सुनील तटकरे, जिल्हा परिषद रायगड अध्यक्षा योगिता पारधी, आमदार भरत गोगावले, आमदार बाळाराम पाटील, आमदार अनिकेत तटकरे, जिल्हाधिकारी निधी चौधरी, जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील,पोलीस अधीक्षक अशोक दुधे जिल्ह्यातील इतर प्रमुख अधिकारी, लोकप्रतिनिधी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री ना. अजित दादा पवार म्हणाले की, जिथे करोना संक्रमित रुग्णांचे प्रमाण जास्त आहे अशा जिल्ह्यामध्ये आम्ही दौरा करायचे ठरविले. त्यानुसार आज जिल्ह्यातील करोनासदृष्य परिस्थितीचा आढावा घेऊन जिल्ह्यातील रुग्णालयाचे फायर ऑडिट, ऑक्सिजन ऑडिट करून घ्या,असे निर्देश संबंधितांना दिले.

पनवेलला सिडकोचे व पेणला जेएसडब्लू जम्बो कोविड हॉस्पिटल कार्यान्वित करण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी. करोनाची तिसरी लाट आल्यास आरोग्य सोयीसुविधांची कोणतीही कमतरता भासू नये, या दृष्टीने शासन प्रशासनाच्या सर्व स्तरावर बरोबर आहे. कालच टप्पाटप्प्याने लॉकडाऊन कमी करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यात प्रामुख्याने कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यातील करोना वाढीचा दर १० टक्केच्या पुढे असल्याने येथे शिथिलता देण्यात आलेली नाही. नागरिकांचा त्रास कमी करण्याचा प्रयत्न आपण सर्वांनी मिळून करायला हवा. म्युकरमायकोसिससारख्या आजारांवरील उपचारांसाठी असलेल्या औषधांची किंमत जास्त आहे. त्यामुळे या औषधांवरील जीएसटी कमी करून नागरिकांचा त्रास कमी करण्याचा प्रयत्न शासनाने केला आहे. म्युकरमायकोसिस म्हणजेच काळी बुरशी या आजाराचे उपचार तीन प्रकारात विभागले आहे. पहिल्या प्रकारात ज्यांना खर्च शक्य नाही त्यांना सर्व शासकीय रुग्णालयात मोफत उपचार देण्यात येत आहेत. दुसऱ्या प्रकारात महात्मा फुले जन आरोग्य योजनेतून उपचार करण्यात येत आहेत. तर तिसऱ्या प्रकारात ज्यांना खाजगी रुग्णालयात उपचार करायचे आहेत त्यांना खाजगी रुग्णालयात उपचार उपलब्ध आहेत. अशी माहिती देवून ना.पवार पुढे म्हणाले की, ही माहिती जनतेपर्यंत पोहोचवा.

कोकण किनारपट्टीवर आतापर्यंत ४ चक्रीवादळे येऊन गेली. चक्रीवादळाचा तडाखा कोकणाला सारखा बसत असून यामुळे येथे प्रचंड प्रमाणात नुकसान होत आहे. यासाठी शासनाकडून यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. यात भूमिगत विद्युत केबल करणे ज्यामुळे वादळाने विद्युत खांब पडण्याचा धोकाच राहणार नाही. त्यासह कोकणात वीज पडण्याचे प्रमाण अधिक आहे, त्यावर उपाय म्हणून लायटनिंग अरेस्टर बसविण्यात येणार आहेत तर झाडे उन्मळून पडण्याचे देखील प्रमाण अधिक आहे. किनारपट्टीवर सारखे येणाऱ्या चक्रीवादळाचा तडाखा सहन करतील, अशी झाडे लावण्याचे निर्देश त्यांनी वन विभागाला दिले. अशा प्रकारच्या कायम स्वरूपी उपाययोजना करण्यासाठीचे प्रस्ताव शासनाला त्वरित सादर करण्यात यावे असे निर्देश त्यांनी संबंधितांना दिले तर यासाठी निधीची कमतरता पडणार नाही असेही आश्वस्त केले.

या बैठकीस खासदार सुनील तटकरे, आमदार भरत गोगावले,आमदार बाळाराम पाटील, आमदार अनिकेत तटकरे, जिल्हा परिषद अध्यक्ष योगिता पारधी, विभागीय आयुक्त अण्णासाहेब मिसाळ ,मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, पोलीस अधीक्षक अशोक दुधे, पनवेल महानगरपालिका आयुक्त सुधाकर देशमुख, तसेच विविध शासकीय विभागांचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

## वलप येथे लसीकरण केंद्राचे काशिनाथ पाटील यांच्या हस्ते उद्घाटन

### जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून ग्रामपंचायत हद्दीत वृक्षारोपण



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील वलप ग्रामपंचायत हद्दीत मा.सभापती काशिनाथ पाटील यांच्या प्रयत्नाने कोरोना लसीकरण केंद्राचे उद्घाटन वलप ग्रामपंचायतीमध्ये करण्यात आले. तसेच यावेळी जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून ग्रामपंचायत परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेवून तो कमी करण्यासाठी लसीकरण हाच एकमेव पर्याय असल्याने प्रत्येक ग्रामपंचायत स्तरावर लसीकरण केंद्र सुरू करावी, असे प्रशासनातर्फे आवाहन करण्यात येते. त्याचाच एक भाग म्हणून वलप ग्रामपंचायत हद्दीत ग्रामपंचायत कार्यालयामध्ये मा.सभापती काशिनाथ पाटील यांच्या प्रयत्नाने लसीकरण केंद्र सुरू करण्यात आले. तसेच कोरोनाबाबत नागरिकांना जनजागृती करून जास्तीत जास्त लोकांनी लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन नागरिकांना करण्यात आले. यावेळी सरपंच जयमाला भोलेनाथ पाटील, उपसरपंच मनोज पाटील, ग्रामसेवक सतीश देवकते तसेच ग्रामपंचायत सदस्य, आरोग्य विभागाचे डॉक्टर राज चव्हाण, आरोग्य सेवक दडे आदी मान्यवर उपस्थित होते.

## पुण्यात होणार स्पुतनिक व्ही लसीचे उत्पादन, सीरमला दिली परवानगी

**नवी दिल्ली: वृत्तसंस्था**

पुण्यातील सीरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया आता रशियाची 'स्पुतनिक व्ही' या लसीचेही उत्पादन करणार आहे. ड्र्ग कंट्रोलर जनरल ऑफ इंडियाने ही मंजुरी दिली आहे, सूत्रांनी ही माहिती दिली आहे. सीरम इन्स्टिट्यूटने केंद्र सरकारकडे स्पुतनिक लसीच्या उत्पादनाची मागणी केली होती. ड्र्ग कंट्रोलर ऑफ इंडियाने सीरम इन्स्टिट्यूटला स्पुतनिक व्ही लसीचे उत्पादन करण्याची मंजुरी दिली आहे. तसंच पुण्यातील हडपसर येथील सीरमच्या प्लांटकडे अधिकृत परवाना असल्याने स्पुतनिक व्हीच्या परीक्षण आणि विश्लेषणासाठी मंजुरी दिली गेली आहे, असं सूत्रांनी सांगितल्याचं वृत्त एएनआयने दिलं आहे. रशियाच्या स्पुतनिक व्ही या लसीचे उत्पादन करण्याची तयारी सीरम इन्स्टिट्यूटने दर्शवली होती. यासाठी सीरमने ड्र्ग कंट्रोलर ऑफ इंडियाकडे लसीच्या चाचणीसाठी परवाना देण्याची मागणी काही दिवसांपूर्वी केली होती. स्पुतनिक व्हीच्या टेस्ट ॲनालिसिस आणि टेस्टिंगसाठी सीरमने ही मंजुरी मागितली होती. रशियाची स्पुतनिक व्ही या लसीचे उत्पादन भारतात डॉ. रेड्डीज लॅबोरेटरीजकडूनही करण्यात येणार आहे.

## जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्थेतर्फे रस्त्याचे डांबरीकरण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

उत्कर्ष को. ऑपरेटिव्ह हौ. सोसायटी, से ११, खांदा कॉलनी यांच्या मागणी नुसार जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्थे तर्फे सोसायटीच्या आवारातील रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले.



सदर प्रसंगी पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितमदादा म्हात्रे, उपनगराध्यक्ष गणेश पाटील, नगरसेवक शिवाजी थोरवे, ज्येष्ठ नेते अनिल बंडगर, नगरसेविका श्रीमती वंदना भगत, युवा अध्यक्ष वैभव गलंडे, युवा नेते पंकज वाघ, युवा नेते सचिन मोकल सोसायटी पदाधिकारी माधव पाटील, गुलाब साखरे, रवींद्र निप्रुळ, बाजीराव मोहिते, बबन कांबळे, सुनिल देशपांडे, आबा माने, शिवकर गुरूजी, अशोक कारंडे, श्रीराम कानाल, सौ भारती मोहिते, सौ मालन गेजगे उपस्थित होते. यावेळी सोसायटी पदाधिकाऱ्यांनी रस्त्याचे डांबरीकरण केल्याबद्दल जे एम म्हात्रे चॅरिटेबल ट्रस्टचे व प्रितमदादा म्हात्रे यांचे आभार मानले.

## सर्पमित्र प्रमेय जाधव याने आठ फुटी अजगराला जीवदान

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातील सर्पमित्र तथा सापांबद्दल जनजागृती करणारे प्रमेय जाधव याने वाघेश्वर नगर रोठ खु.येथील चंद्रभागा सोसायटी परिसरात सुमारे आठ फुटी अजगराला सुरक्षितरित्या पकडून जीवदान दिले आहे.

चार दिवसांपूर्वी प्रमेय याने त्याच परिसरातील साई आँटो गँरेज व मुठवली खु.येथे भयंकर विषारी असणाऱ्या दोन कोब्रा जातीच्या सापांना पकडून जीवदान दिल्याची घटना ताजी असतानाच आज पुन्हा एकदा सर्पमित्र प्रमेय याने त्याच परिसरातील चंद्रभागा सोसायटीमध्ये आठ फुटी अजगराला मोठ्या कौशल्याने पकडुन सुरक्षितरित्या जंगल भागात नेऊन सोडले आहे.

चंद्रभागा सोसायटी परिसरात ब-याच दिवसांपूर्वी अजगर फिरत असल्याचे अनेकांच्या द्रुष्टीस पडले होते.त्यामुळे अजगराबाबत थोडीफार भिती ही काही जणांच्या मनात होती.आज तेथील रहिवासी वर्गाच्या द्रुष्टीस अजगर पडले असता प्रमेय जाधव याला याबाबत माहिती दिली असता प्रमेय यानेही क्षणाचाही विलंब न लावता बिनविषारी अजगरास हातोहात पकडून आपल्या कौशल्याची चुणूक दाखविली.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!
माझे कुटुंब माझी जबाबदारी
ग्रुप ग्रामपंचायत कोन
श्री.निलेश नथुराम म्हात्रे — सरपंच
सौ.अनुशा अशोक म्हात्रे — उपसरपंच
सदस्य
श्री.दिपक धाया म्हात्रे
श्री.घनश्याम महादेव पाटील
श्री.जगन्नाथ पांडुरंग सार्डेकर
सौ.आशा अशोक घरत
सौ.दिपिका दिपक कांबळे
सौ.सुलोचना ज्ञानेश्वर भागीत
सौ.शशिकला नारायण घरत
श्री.जितेश बाळाराम शिसवे
श्री.महेश जोमा माळी
श्रीमती.ताईबाई बाळकृष्ण पाटील
ग्रामविकास अधिकारी : रमेश नामदेव तारेकर
लेखनिक : श्री.नाथा बाळाराम घरत / श्री.अमोल पांडुरंग केदारी / कर्मचारी : राकेश र.कांबळे
झाडांना घाला पाणी
ते वाढवतील पाऊस पाणी

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!
घाबरु नका... पण जागरुक रहा...
कोरोना विषाणूपासून आपला बचाव करा...!
ग्रुप ग्रामपंचायत नांदगांव
सौ.विजेता मनोहर भोईर — सरपंच
श्री.दिपक महादेव ठोंबरे — उपसरपंच
सदस्य
सौ.प्रणिता प्रवीण गायकर
श्री.कल्पेश बाबुराव पाटील
सौ.सिताबाई रामदास खुटले
सौ.कुंदा शिवराम पाटील
सौ.अर्चना मिथुन पाटील
सौ.सरिता संदीप पाटील
श्री.रामदास सुकऱ्या कातकरी
श्री.विक्रम बाळकृष्ण फडके
सौ.धनश्री धनराज ठोंबरे
सौ.धनश्री धनराज फडके
ग्रामसेवक : योगिराज ना.मनवर
पर्यावरणाची मैत्री करू या!
जीवन अधिक सुंदर बनवू या!